आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१६ जुलै २०२६ - गुरूवार

**ठळक बातम्या**

- हायड्रोजनवर चालणारी देशातली पहिली रेल्वे गाडी उद्यापासून सुरू होणार
- डिझेल आणि  विमान इंधनांवरच्या निर्यात शुल्कात  वाढ
- पायाभूत सुविधांच्या विकासाकरता अनुकूल परिसंस्था विकसित करण्याची जबाबदारी ही सामूहिक असल्याचं संरक्षण मंत्र्यांचं प्रतिपादन
- वार्षिक जगन्नाथ रथयात्रेला पुरी आणि अहमदाबादमधे प्रारंभ
- अमेरिकेच्या हल्ल्यांविरोधात विनाशक हल्ले करण्याचा इराणचा इशारा

**आणि**

- आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेत भारतीय महिला मुष्टियोद्ध्यांनी केली तीन सुवर्ण आणि १० रौप्य पदकांची कमाई

<><><><><>

हायड्रोजनवर चालणाऱ्या देशातली पहिली रेल्वे गाडी उद्यापासून सुरू होणार आहे. हरयाणात जिंद रेल्वे स्थानकावर उद्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या गाडीला हिरवा झेंडा दाखवून रवाना करतील. हायड्रोजन फ्युएल सेल या तंत्रज्ञानावर आधारित ही रेल्वे गाडी जिंद आणि सोनीपत स्थानकांदरम्यान धावेल. या तंत्रज्ञानात हायड्रोजनचं विजेत रुपांतर करून त्यावर गाडी चालते. परिणामी धुराऐवजी पाण्याची वाफ बाहेर पडत असल्यानं कार्बन उत्सर्जन शून्य होतं. ही रेल्वे गाडी संपूर्णपणे स्वदेश निर्मित आहे. 'ग्रीन हायड्रोजन'च्या वापरामुळे जीवाश्म इंधनावर आधारित औष्णिक ऊर्जा प्रकल्पांमधून निर्माण होणाऱ्या विजेवरचं अवलंबित्व कमी व्हायला मदत होणार आहे.

<><><><><>

केंद्र सरकारने डिझेल आणि  विमान इंधनांवरच्या निर्यात शुल्कात  वाढ केली असून, आजपासून हे नवे दर लागू झाले. सुधारित दरांनुसार डिझेलवर  प्रति लिटर साडे १५ रुपये,

तर विमान इंधनावर प्रति लिटर साडे १४ रुपये निर्यात शुल्क लागू होईल. पेट्रोलवरील निर्यात शुल्कात मात्र प्रति लिटर अडीच रुपये कपात करण्यात आली आहे.

इंधनावरच्या  उत्पादन शुल्कात कोणतेही बदल झालेले नाहीत. पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर देशात इंधनाची उपलब्धता नियमित राखण्याच्या दृष्टीनं गेल्या २७ मे पासून इंधनावरच्या विविध आकारांचा आढावा दर १५ दिवसांनी घेतला जातो.

<><><><><>

प्रगत पायाभूत सुविधा हे विकसित संस्कृतीचं लक्षण असल्याचं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केलं आहे. नवी दिल्लीत आयोजित बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनच्या तांत्रिक परिसंवादाला ते संबोधित करत होते. पायाभूत सुविधांचा विकास ही केवळ सरकारची जबाबदारी नसून उत्कृष्टतेला चालना देणारी परिसंस्था विकसित करण्याची जबाबदारी ही सामूहिक असल्याचंही सिंह यांनी अधोरेखित केलं. उद्योग क्षेत्र, शैक्षणिक संस्था, अभियंते आणि प्रशासक यांनी देखील ही जबाबदारी घ्यावी, असं आवाहन सिंह यांनी यावेळी केलं. आज उभारल्या जाणाऱ्या पायाभूत सुविधा आगामी काळात देशाच्या संस्कृतीची ओळख ठरवतील, असंही सिंह यावेळी म्हणाले.

**होल्ड.. बाईट - राजनाथ सिंह**

अटल बोगदा, उमलिंग ला इथे जगातल्या सर्वाधिक उंचीवरचा रस्ता आणि सुमारे १३ हजार फूट उंचीवर बांधलेला सेला बोगदा यांसारखे महत्त्वपूर्ण प्रकल्प हे बॉर्डर रोड ऑरगनायझेशनच्या क्षमतेचे साक्षीदार आहेत, अशा शब्दांत त्यांनी संस्थेचं कौतुक केलं.

<><><><><>

ओडिशात जगन्नाथ पूरी इथं लाखो भाविकांच्या उपस्थितीत जगन्नाथ रथयात्रेला आज सुरुवात झाली. यात्रेदरम्यान भगवान जगन्नाथ आपली बहीण सुभद्रा आणि बंधु बलराम यांच्यासह रथात विराजमान होऊन गुंडीच्या मंदिरासाठी प्रस्थान करतात. नऊ दिवस या मंदिरात त्यांचा मुक्काम असतो.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना रथयात्रेनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

महाप्रभु जगन्नाथांच्या कृपेनं देश आणि देशवासीयांच्या सुख समृद्धीत निरंतर वृद्धी होत राहो, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

हा भारताच्या कालातीत आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारशाचा एक तेजस्वी आविष्कार आहे, रथयात्रेशी संबंधित परंपरांनी भारत आणि जगभरातील अनेक पिढ्यांना प्रेरणा दिली असल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

लोकसभेचे सभापती ओम बिर्ला आणि केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनीही जनतेला रथयात्रेनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

गुजरातमध्ये अहमदाबाद इथल्या जगन्नाथ मंदिरात यात्रेला प्रारंभ होत असून, अहमदाबाद इथं जमलपूर परिसरातल्या ४०० वर्ष जुन्या श्री जगन्नाथ मंदिरात झालेल्या मंगल आरतीत आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह सहभागी झाले. या मंदिरापासून आज १४९ व्या श्री जगन्नाथ महाराजांच्या रथयात्रेची कडक सुरक्षा व्यवस्थेत सुरूवात झाली. आषाढ शुक्ल द्वितीयेला ही रथयात्रा दरवर्षी आयोजित केली जाते. त्यावेळी श्री जगन्नाथ महाराजांचं दर्शन घेण्यासाठी भक्त मोठ्या संख्येनं एकत्र येतात.

<><><><><>

दिल्लीत जंतरमंतर इथं बेमुदत उपोषणाला बसलेले सामाजिक कार्यकर्ते सोमन वांगचुक यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवावं आणि दररोज सरकारी डॉक्टरांकडून त्यांची तपासणी करुन घ्यावी असे निर्देश दिल्ली उच्च न्यायालयाने केंद्र आणि दिल्ली राज्य सरकारला दिले आहेत. जीवन हा अनमोल ठेवा असल्याचं न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती तेजस कारिया यांच्या पीठानं सांगितलं.

नीट आणि इतर स्पर्धा परीक्षामधे गैरप्रकार उघडकीला आल्यानंतर कॉक्रोच जनता पार्टी या संघटनेनं पुकारलेल्या आंदोलनाच्या पाठिंब्यात वांगचुक यांनी २८ जून पासून उपोषण सुरु केलं. तेव्हापासूनच्या १९ दिवसात त्यांचं वजन ९ किलोने घटल्याचं त्यांना तपासणाऱ्या डॉक्टरांनी सांगितलं. वांगचुक यांच्या प्रकृतीची दररोज तपासणी केली जावी अशी मागणी करणारी याचिका दिल्ली उच्च न्यायालयात दाखल झाली असून, त्यावर सुनावणी होत आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा ही आंदोलकांची प्रमुख मागणी आहे.

<><><><><>

अमेरिकेने इराणवर हल्ले वाढवल्यानंतर इराणच्या संयुक्त सेनादलांनी अधिक तीव्र प्रत्युत्तर देण्याची धमकी दिली आहे. प्रत्युत्तरातल्या हल्ल्यात आखाती प्रदेशातल्या पायाभूत सुविधांचा संपूर्ण विध्वंस होऊ शकतो असं इराणच्या लष्कराचे प्रवक्ते कर्नल इब्राहीम झोल्फागढी यांनी खातम अल अनबिया या मुख्यालयातून प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. होर्मुझ सामुद्रधुनीच्या दळणवळणात अमेरिकेसारख्या परकीय देशाला इराण कदापि हस्तक्षेप करु देणार नाही, असं या पत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

जागतिक पुरवठा साखळीतल्या अडथळ्यांसह विविध आर्थिक आव्हानांचा सामना करण्यासाठी बिम्स्टेक सदस्य देशांमध्ये अधिक सहकार्य गरजेचं असल्याचं राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी अधोरेखित केलं आहे. नवी दिल्लीत आज झालेल्या बिम्स्टेक देशांच्या राष्ट्रीय सुरक्षा प्रमुखांच्या पाचव्या बैठकीत ते बोलत होते. दहशतवाद, सीमापार संघटित गुन्हेगारी, सायबर धोके आणि सागरी सुरक्षेपुढची आव्हानं यांचा सामना करण्याच्या दिशेने सदस्य देशांनी सहकार्य बळकट केलं असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी बेल्जियममध्ये ब्रुसेल्स इथे भारतीय उद्योजक संघटनांच्या प्रतिनिधीमंडळाशी संवाद साधला. या शिष्टमंडळात फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री, कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री, असोचॅम आणि इतर प्रादेशिक संघटनांच्या सदस्यांचा समावेश होता. भारत युरोपियन महासंघ मुक्त व्यापार करार भारतीय उद्योगांसाठी कशा प्रकारे संधींची नवी दारं खुली करू शकतो तसंच भारतातले व्यवसाय, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी हा करार कसा फायद्याचा होईल, यावर गोयल यांनी चर्चा केली.

<><><><><>

जकार्ता इथं सुरू असलेल्या आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेत भारतीय महिला मुष्टियोद्ध्यांनी शानदार कामगिरी करत तीन सुवर्ण आणि १० रौप्य पदकांची कमाई केली. १९ वर्षाखालील ५१ किलो वजनी गटात भारताच्या चंद्रीका पुजारीनं आणि प्राचीनं सुवर्णपदक जिंकलं. याच गटात गुंजन, जॉयश्री, चाहत, अंशिका, मेघा श्योकंद आणि प्राची तोकस यांना रौप्य पदकं मिळाली. दुसरीकडे २३ वर्षांखालील ५४ किलो वजनी गटात भारताच्या निशा हिने

जपानच्या कोरिन कोकोफूचा ५-० असा एकतर्फी पराभव करत सुवर्णपदक मिळवलं. या गटात नितिका चंद, काजल, मुस्कान आणि प्रियांका यांना रौप्य पदकं मिळाली.

**<><><><><>**

फिफा फूटबॉल विश्वचषक स्पर्धेत काल अर्जेंटिनाने इंग्लंडचा दोन विरुद्ध एक असा पराभव करून अंतिम फेरी गाठली. आता अंतिम सामना अर्जेंटिना आणि स्पेन यांच्यात येत्या रविवारी १९ जुलै रोजी होईल.

**<><><><><>**

हवामान विभागानं आज अरुणाचल प्रदेश, पश्चिम बंगालचा काही भाग आणि ओडिशा येथील काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. तसंच आसाम, मेघालय, बिहारसह उत्तराखंडमध्येही आज मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. आंध्र प्रदेश, तामिळनाडू, पुद्दुचेरीच्या काही भागांत आज उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//